MHOS100018622025

## नियमित दिवाणी दावा क्र.७११/२०२५.

### निशाणी क्र.११ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती होण्याकरीता वादी व प्रतिवादी यांनी संयुक्तरित्या दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांचे कथन की, प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता व दावा मिळकतीची मोजणी होऊन हद्दी खुणा कायम होऊन मिळणे करीता दाखल केला आहे. मौजे पिंपळगांव लिंगी, ता. वाशी येथील जमीन भु.क्र. ५६२ क्षेत्र ११ हे. ०७ आर या मिळकतीचे वादी हे मालक व कब्जेवहिवाटदार आहेत.

**०३.** अर्जदारांचे कथन की, जमीन सर्व्हे नंबर ५६२ क्षेत्र १२ हे. ३६ आर या मिळकतीचे वादी व प्रतिवादी हे मालक व कब्जेवहिवाटार आहेत. परंतु, वादी व प्रतिवादींच्या मिळकतींच्या हद्दी खुणा नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादींमध्ये बांध हद्दीचे कारणावरुन वाद आहेत. त्यामुळे दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दीखुणा कायम केल्याशिवाय वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुषटात येणार नाही. त्यामुळे सदर दावा मिळकतींची मोजणी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वाशी यांच्यामार्फत होणे

आवश्यक आहे.

०४. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीवरील वादींच्या कब्जेउपभोगास प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता व दावा मिळकतीची मोजणी होऊन हद्दी खुणा कायम होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीचे कथन आहे की, वादी व प्रतिवादी हे भु.क्र. ५६२ मधील जमीन खातेदार असुन एकमेकांचे शेतशेजारी आहे. वादी व प्रतिवादी यांचे जमीनीमध्ये बांध हद्दी खुणा निश्चीत नाहीत. त्यामुळे वादी व प्रतिवादीमध्ये कब्जेवहिवाटीचे कारणावरुन सतत भांडणे होतात. त्यामुळे केवळ तोंडी पुरावा देवुन दावामिळकतीमध्ये प्रतिवादीने अतिक्रमण केले आहे किंवा कसे हे शाबीत करता येत नाही. म्हणुन माझ्या मते दावामिळकतीची मोजणी करुन दावामिळकतीच्या हद्दीखुणा तज्ञ मोजणीदारामार्फत निश्चित न केल्यास वादींच्या दावामिळकतीवर अतिक्रमण आहे किंवा नाही हे शाबीत होणार नाही. परिणामी, वादी व प्रतिवादीमध्ये मिळकतीच्या हद्दीवरुन असलेला वाद संपुष्टात येणार नाही. म्हणुन दावामिळकतीची उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वाशी यांच्यामार्फत मोजणी होणे आवश्यक आहे. सदर मोजणीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची प्रत्यक्ष स्थिती हद्दीखुणा, अतिक्रमण या बाबतची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निर्णय करणे सोईचे होणार आहे. म्हणुन दावामिळकतींची मोजणी करुन या प्रकरणात वस्तुस्थितीदर्शक अहवाल

मागविणे हे अंतीम न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१) अर्ज निशाणी क्रमांक ११ मंजुर करण्यात येत आहे.

२) उपअधिक्षक, भुमि अभिलेख, वाशी यांची या प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्ती करण्यात येते.

३) न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे पिंपळगाव लिंगी, ता. वाशी येथील जमीनी भु.क्र. ५६२ मधील सर्व पोटहिस्स्यांची प्रत्यक्ष वहिवाटीचे क्षेत्र व ७/१२ वरील क्षेत्र विचारात घेऊन पोटहिस्स्यांसह मोजणी करुन हद्दीखुणा निश्चित कराव्यात तसेच दावा मिळकत ही कोणत्या ठिकाणी स्थित आहे हे दर्शवून कोणी कोणाच्या मिळकतीवर कोणत्या बाजुने किती अतिक्रमण केले आहे त्याबाबत वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल नकाशासह न्यायालयामध्ये आदेश तारखेपासुन दोन महिन्यात सादर करावा.

४) न्यायालयीन आयुक्त यांनी वादी, प्रतिवादी व दावामिळकतीच्या लगतच्या मिळकतधारकांना पाहणी व मोजणी पुर्वी लेखी पुर्व सुचना द्यावी.

५) वादी व प्रतिवादी यांनी आपआपले मिळकतीचे हद्दीपावेतो न्यायालयीन आयुक्त कामाचे शुल्क परस्पर उपअधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, वाशी यांचेकडे भरणा करावे.

६) आदेशीका शुल्क भरल्यानंतर कमीशन रिट पाठवावे.

MAHADEVI VISHAL PATIL
Digitally signed by MAHADEVI VISHAL PATIL
Date: 2026.03.18 15:25:35 +0530

वाशी. (श्रीमती एम.व्ही. पाटील–राठोडे)

दिनांक – १८/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वाशी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. A.M. Wagh, Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | --- | Civil Court, Jr. Division, Washi, Tq.Washi, Dist.Dharashiv |
| Date of order | --- | 18/03/2026 |
| Order signed by the presiding officer on | --- | 18/03/2026 |
| Order uploaded on | --- | 20/03/2026 |